सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## काँग्रेसचे खासदार लोकसभाध्यक्षांच्या दालनात घुसले, शिवीगाळ केल्याचा आरोप

### भाजपच्या मंत्र्याने व्हिडिओ केला शेअर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नवी दिल्ली**

देशाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून लोकसभेत मागच्या काही दिवसांपासून जोरदार गदारोळ सुरू आहे. अशातच आज केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एक व्हिडिओ पोस्ट करत काँग्रेसच्या खासदारांवर गंभीर आरोप केला आहे. काँग्रेसचे २० ते २५ खासदार लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयात घुसले आणि त्यांना शिवीगाळ केली. तसेच या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी दिली, असे रिजिजू यांनी व्हिडिओ शेअर करत म्हटले आहे.

लोकसभेत काही दिवसआधीच किरेन रिजीजू यांनी एक व्हिडिओ पोस्ट केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तराचे भाषण होणार होते. पण, काँग्रेसच्या महिला खासदार पंतप्रधानांच्या आसनाजवळ गेल्याने गोंधळ झाला होता. किरेन रिजिजू यांनी गुरुवारी १२ फेब्रुवारी आज नवीन व्हिडिओ शेअर करत खळबळ उडवून टाकली आहे. २० ते २५ काँग्रेसचे खासदार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या दालनात गेले आणि त्यांना शिवीगाळ केली. तसेच बेकायदेशीरपणे हा व्हिडिओ बनवला आहे.

रिजिजू म्हणाले, प्रियंका गांधी, के.सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयात उपस्थित होते. प्रियंका गांधी खासदारांना भांडण करण्यासाठी उकसवत होते. लोकसभा अध्यक्ष ही खूप भोळे आणि शांत आहेत. नाहीतर खूप मोठी कारवाई झाली असती असा आरोप त्यांनी केला.

## रोहित पवार म्हणाले- दादा एकटे पडल्यासारखे दिसत होते

### नरेश अरोरांना कॉन्ट्रॅक्ट मिळायलाच हवा, असा काहींचा आग्रह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

नरेश अरोरा यांना कॉन्ट्रॅक्ट मिळायलाच हवा, अशी काहींची भूमिका होती. मात्र, अजित दादांची कॉन्ट्रॅक्ट संदर्भात वेगळी भूमिका होती, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. मी कोणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नसल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. तटकरे आरोरांच्या कॉन्ट्रॅक्ट साठी चर्चेला गेल्याचा अंदाज असल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र या सर्व गोष्टींची लवकरात लवकर चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली. दादांना का उशीर झाला? हे मी बोलून दाखवले, दादा गाडीने गेले असते तरी दुर्घटना घडली नसती, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांचा पक्ष हा एनडीए सोबत जाणार होता का? या संदर्भातल्या प्रश्नाला आपण सोमवारी किंवा मंगळवारी मुंबईमध्ये पत्रकार परिषदेत उत्तर देऊन स्पष्ट करेल, असं म्हणत रोहित पवार यांनी या उत्तरावर बोलणे टाळले. आम्हाला सत्तेत जायचे असते तर केव्हाच गलो असतो. मात्र




विचारासाठी आम्ही संघर्ष करत आलेलो आहोत, असे देखील रोहित पवार यांनी स्पष्ट केले. मी कुठेही खोटं बोललेलो नसल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. सोमवारी किंवा मंगळवारी जी पत्रकार परिषद होणार आहे. त्यामुळे काय घडले? कुठे झाले? विरणीकरणावर कोण काय बोलले? या सर्व गोष्टींवर बोलणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितलं.

गेल्या चार महिन्यापासून दादा एकटे पडल्यासारखे दिसत होते. देशपातळीवरचे आणि राज्यपातळीवरचे लोक त्यांच्यासोबत नव्हते. मात्र काही मोजके आमदार दादांसोबत होते. आजही तेच आमदार दादांच्या अपघाताबाबत बोलत असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. हा अपघात आहे की घातपात? हाच एक मुद्दा आज महत्त्वाचा आहे. सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार हे अमित शहा आणि नरेंद्र मोदी यांना भेटले. त्यावेळी त्यांनी देखील अजित पवार यांच्या अपघाताचे कारण समोर आले पाहिजे, अशी मागणी केली असेल, असे आम्हाला वाटते, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मोदी आणि शहा यांचा मला वेळ मिळाला नाही. मात्र अधिवेशन चालू असल्यामुळे काही नेते बिझी असतील. मात्र मी मेलच्या माध्यमातून माझे प्रश्न त्यांच्यासमोर मांडणार असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

## पायलटने जाणीवपूर्वक इंधन पुरवठा बंद केल्याने विमान अपघात

### अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत मोठा दावा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नवी दिल्ली**

गेल्यावर्षी जून महिन्यात अहमदाबाद येथे भीषण विमान अपघात होऊन २६० प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या अपघातप्रकरणी तपास यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, या चौकशीदरम्यान काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. ही घटना तांत्रिक दोषामुळे न होता पायलटने जाणूनबुजून घडवली असल्याचा अहवाल भारतीय तपास यंत्रणा तयार करत असल्याचा दावा इटालियन दैनिक कोरीएर डेला सेराच्या वृत्तातून केला आहे. नवी दिल्ली आणि वॉशिंग्टनमधील दोन सूत्रांच्या हवाल्याने त्यांनी वृत्त दिलं आहे. इटालियन वृत्तपत्रात छापून आलेल्या या वृत्ताचे पडसाद आता भारतात उमटायला सुरुवात झाली आहे.भारतीय तपास यंत्रणांनी असे निश्चित केले आहे की १२ जून २०२५ रोजी इंजिनमध्ये इंधन पुरवठा बंद झाल्यानंतर झालेला अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला नव्हता तर जाणीवपूर्वक केलेल्या कृतीमुळे झाला होता आणि अधिकारी आता त्यांचा अंतिम अहवाल तयार करण्याची तयारी करत आहेत. या तपासात अमेरिकन तज्ज्ञही मदत करत आहेत, असं वृत्तपत्राने वृत्तात म्हटलं आहे.

**इंधन पुरवठा बंद केला अन्**

दोघांपैकी एका पायलटने इंधन नियंत्रण स्विच बंद केले होते. यामुळे विमानाची शक्ती गेली आणि ते जमिनीवर कोसळले. कॅप्टन सुमित सभरवाल हे पायलट-इन-कमांड होते, तर फर्स्ट ऑफिसर क्लाईव्ह कुंदर हे सह-पायलट होते, असं या वृत्तपत्राने म्हटलं आहे.

ब्लॅक बॉक्स डेटानुसारही हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला असल्याचा दावा फेटाळून लावला आहे. त्यामुळे, इंजिन इग्निशन आणि शटडाउन नियंत्रित करणाऱ्या स्विचच्या मॅन्युअल हालचालीकडे लक्ष वेधण्यात आले. अपघाताच्या वेळी, दोन्ही इंजिन बंद असल्याचे आढळून आले.

## आता दादाच नाही राहिला तर विलिनीकरणावर काय बोलणार - सुप्रिया सुळे

### बऱ्याच लोकांना गोष्टी माहितीये, पण...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नवी दिल्ली**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही पक्षातील नेत्यांचे विलिनीकरणावर अजूनही एकमत झालेले नाही. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते विलिनीकरणाचा मुद्दा टाळताना दिसत आहेत, तर शरद पवारांच्या गटातील नेते ही चर्चा पूर्ण झाली होती, असे सांगत आहेत. या चर्चेत असलेल्या खासदार सुप्रिया सुळे यांना याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी विलिनीकरणाबद्दल सविस्तर भूमिका मांडली.

खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. विलिनीकरण होणार होते, तर कोणत्या पक्षाचे कोणत्या पक्षात होणार होते आणि तुम्ही एनडीए (भाजपा)मध्ये सामील होणार होता का? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, लोकशाही आहे, प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे आणि बऱ्याच लोकांना बऱ्याच गोष्टी माहिती आहेत. पण, अनेकवेळा लोकांना आवडत नाही मी हे बोललेलं. तुम्हाला सगळ्यांना माहिती आहे की, माझं पोट किती मोठं आहे. आणि आज माझा भाऊच नाही राहिला हो. त्यामुळे काय कुणाबद्दल काय काढावं. भावाचं आणि माझं जे काय बोलणं होतं, ते दादाच्या (अजित पवार) आणि माझ्यामध्ये आहे. ते वास्तव आहे, असे उत्तर सुप्रिया सुळेंनी दिले.



**...तर खूप गोष्टी झाल्या असत्या**

अजित पवार असते तर विलिनीकरणाची घोषणा झाली असती का? असाही प्रश्न सुप्रिया सुळेंना विचारण्यात आला. त्या म्हणाल्या, दादा असता तर खूप अशा गोष्टी झाल्या असत्या. रेवतीच्या लग्नाची घोषणाही दादानीच केली असती. पण, दुर्दैव आहे की, दादा आज आपल्यात नाहीत. पण दादाची जी अपूर्ण स्वप्ने आहेत ती आम्ही पूर्ण करू.

## एअर इंडिया विमान अहमदाबाद दुर्घटना सर्वोच्च न्यायालयाकडून महत्वपूर्ण विधान

### तुकड्या-तुकड्याने माहिती प्रसिद्ध होणे अत्यंत दुर्दैवी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नागपूर**

सप्टेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एएआयबीच्या प्राथमिक अहवालातील निवडक माहितीच्या गळतीवर तीव्र चिंता व्यक्त केली होती. या गळतीमुळे वैमानिकांच्या चुकीचा कथानक माध्यमांत तयार होत असल्याचे न्यायालयाने नमूद करत, अशी तुकड्या-तुकड्याने माहिती प्रसिद्ध होणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हटले होते.

चौकशी पूर्ण होईपर्यंत पूर्ण गोपनीयता राखणे आवश्यक असल्यावर न्यायालयाने भर दिला होता. नोव्हेंबरमध्ये, न्यायालयाने तोंडी निरीक्षण नोंदवत वैमानिक सुमीत सभरवाल यांच्यावर कोणताही दोषारोप करता येणार नाही, असे स्पष्ट केले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक बिघाडाबाबत महत्वपूर्ण विधान केले आहे. एअर इंडिया विमान



दुर्घटनेत तब्बल २६० जणांचा मृत्यू झाला होता.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान, विमानातील तांत्रिक बिघाडांबाबत येणाऱ्या माध्यमांतील वृत्तांवर अंधविश्वास न ठेवण्याचे आणि कोणत्याही विशिष्ट विमान ब्रँडविषयी संयमाने वक्तव्य करण्याचे आवाहन पक्षकारांना केले. ही अत्यंत दुर्दैवी दुर्घटना आहेो. २६० निष्पाप जीव गेले. ही कोणत्याही राष्ट्रासाठी लहान शोकांतिका नाही.

वैमानिक मुलगा गमावलेल्या पित्याची वेदना आम्हाला समजू शकते. मात्र, कोणत्याही विशिष्ट विमान ब्रँडविरुद्ध निरीक्षणे नोंदवताना आपण अत्यंत सावध राहिले पाहिजे. एक काळ असा होता की ड्रीमलायनर हे विमान सर्वात सुरक्षित मानले जात होते, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले.यावेळी वैमानिक संघटना व दिवंगत वैमानिक सुमीत सभरवाल यांच्या वडिलांतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ गोपाल शंकरनारायणन आणि ॲड. प्रशांत भूषण यांनी युक्तिवाद केला.

## चंद्रपुरात ठाकरे गटाच्या नगरसेवकांना एक कोटींची ऑफर

### मनसेच्या संदीप देशपांडेंचा आरोप, शिवसेनेचं थेट आव्हान देत प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२चंद्रपूर**

चंद्रपूर महापालिकेत शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेवकांना एक-एक कोटी देण्यात आलेत. शिवाय त्यांना वेगळ्या ऑफर दिल्या आहेत. असा वक्तव्य करत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी मोठा दावा केला आहे. दरम्यान,



या आरोपांवर उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष संदीप गिर्हे यांनी प्रतिक्रिया देत हे आरोप खोडून काढले आहे. शिवाय मनसे नेते संदीप देशपांडे यांनी कुणी पैसे दिलेत आणि कुणी घेतले यांची नावं जाहीर करावं, आम्हाला जर कोणी पैसे देऊन विकत घेतलं असेल तर मी आत्ताच्या आत्ता राजीनामा देईल. असं जाहीर आव्हान केलं आहे.

मनसे नेते संदीप देशपांडे यांना ही माहिती कोणी दिली हे मला माहिती नाही. मात्र त्यांनी नाव जाहीर करावं, आम्हाला जर कोणी पैसे देऊन विकत घेतलं असेल तर मी आत्ताच्या आत्ता राजीनामा देईल. काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आमचा कितीदा अपमान केला, हे आम्हालाच माहित आहे. जर आम्हाला भाजपकडून पैसे घ्यायचे असते तर शेवटच्या क्षणापर्यंत काँग्रेससोबत वाटाघाटी केली नसती, कारमध्ये १५ मिनिटं उरले असताना भाजपसोबत वाटाघाटी केली नसती. एक कोटी आले असते तर आलिशान हॉटेलमध्ये बसून चर्चा केली असती. आम्ही जे काही केलं ते स्वाभिमानासाठी केलं, संदीप देशपांडे स्वतः शिवसैनिक राहिलेले आहे, त्यामुळे त्यांनी असा शिवसैनिकांचा अपमान करू नये, त्यांनी पुरावा द्यावा, आम्ही सगळे शिवसैनिक आणि पदाधिकारी राजीनामा देतो असेही संदीप गिर्हे म्हणाले.

**संजय राऊतांवर हि केली टिका**


संदीप देशपांडे यांनी यावेळी उद्धवसेना आणि उद्धवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांच्यावरही जोरदार टीका केली. चंद्रपूरबाबत राऊतांना अंधारात ठेवलं की त्यांनीच डोळ्यांवर पट्टी बांधली? असा सवाल त्यांनी विचारला. यावेळी संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडताना संदीप देशपांडे म्हणाले की, तुम करे तो रासलीला हम करे तो कॅरेक्टर ढिला, असा राऊतांचा खाक्या आहे. संजय राऊतांची अशा प्रकारची वागणूक बरी नाही. तुम्ही महाविकास आघाडीचा भाग होता तर तुम्ही काँग्रेससोबत बसायला पाहिजे होतं. मग तुम्ही भाजपासोबत कसे काय गेलात. तुम्ही केलं तर चालतं आणि इतरांनी केलं की, मग राजू पाटील भाजपाला विकले गेले, हे असं झालं ते तसं झालं, असं बोलता. अशा अशा प्रकारे बोलणं योग्य नाही, असेही देशपांडे म्हणाले.

## अमरावती-अजनी एक्सप्रेसमधील स्लीपर डबे आता पूर्णत आरक्षित

### १४ फेब्रुवारी पासून आरक्षित स्वरूपात चालविण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

प्रवाशांच्या सोयी-सुविधांचा विचार करून मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ट्रेन क्रमांक १२११९/१२१२० अमरावती-अजनी-अमरावती एक्सप्रेसमधील स्लीपर श्रेणीचे डबे यापुढे पूर्णतः आरक्षित स्वरूपात चालविण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे अनारक्षित प्रवाशांची गर्दी टाळण्यास मदत होणार असून नियमित प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.या गाडीतील वातानुकूलित (एसी) डबे सध्या बंद (लॉक) ठेवण्यात येतील. याशिवाय, स्लीपर श्रेणीतून प्रवास करण्यासाठी केवळ वेध आरक्षित तिकीट असलेल्या प्रवाशांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. यापूर्वी काही वेळा स्लीपर डब्यांमध्ये अनारक्षित प्रवाशांची गर्दी होत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे आरक्षित तिकीट असलेल्या प्रवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.स्लीपर श्रेणीसाठी तिकीट



बुकिंग सेवा निश्चित होताच ती तात्काळ प्रभावाने आरक्षण प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रवासी सर्व पीआरएस काउंटरवर तसेच आयआरसीटीसीच्या अधिकृत संकेतस्थळावरून स्लीपर तिकिटांची आगाऊ नोंदणी करू शकतील. त्यामुळे प्रवाशांना नियोजनपूर्वक प्रवास करणे सुलभ होणार आहे.ही नवी व्यवस्था दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ पासून लागू होणार असून सर्व पीआरएस केंद्रांवरून स्लीपर श्रेणीचे आरक्षण उपलब्ध राहील. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवास सुरू करण्यापूर्वी वेध आरक्षण असल्याची खात्री करून घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच तिकीट तपासणीदरम्यान अडचणी टाळण्यासाठी नियमांचे पालन करावे, असेही सूचित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्लीपर डब्यांमधील प्रवास अधिक सुरक्षित, सुव्यवस्थित आणि आरामदायी होईल, असा विश्वास रेल्वे अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.विशेषतः रोजंदारी कामानिमित्त किंवा शैक्षणिक कारणांमुळे या मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. गर्दीमुळे होणारा गोंधळ, जागेवरील वाद आणि अनधिकृत प्रवास यावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने हा उपाय महत्त्वाचा ठरणार आहे.

## संपादकीय ......

# बळीराजाची दखल

*हवामान बदल, ओला व कोरडा दुष्काळ, प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि कर्जबाजारीपणामुळे अनेक शेतकरी आपल्या आयुष्याचा शेवट करून घेतात, हे दुर्दैवी वास्तव. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात (३८ टक्के) होत असून, ही बाब चिंताजनक आहेच, त्या रोखण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारीही आहे. २०२५ च्या पहिल्या आठ महिन्यांतच राज्यातील ११,१८३ शेतकर्यांनी जीवनयात्रा संपवली. या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी स्वतंत्र कृतिदल निर्माण करण्याचा निर्णय राज्याच्या कृषी विभागाने घेतला. असे कृतिदल निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. दलाच्या माध्यमातून शेतकर्यांच्या मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणार्या आपत्तींवर सर्वसमावेशक उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. तज्ज्ञांचा समावेश असल्यामुळे त्या प्रभावी आणि नेमक्या असतील, अशी अपेक्षा.*

*शेतकर्यांच्या समस्या तांत्रिक, आर्थिक त्याचप्रमाणे मानसिक आहेत, याची जाण ठेवून तज्ज्ञांची निवड केल्याचे दिसते. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्थैर्याच्या समस्या निर्माण होतात. या अडचणींचा सामना करता यावा आणि नैराश्यातून बाहेर पडता यावे, यासाठी मार्गदर्शन आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते. म्हणूनच आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबरच आपत्तीपूर्व, आपत्तीकालीन आणि आपत्तीपश्चात शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या चतुःसूत्री दृष्टिकोनातून एकात्मिक उपाययोजना राबवण्यासाठी कृतिदलाची स्थापना केली जात आहे. आता शेतकर्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणार्या घटकांचा अभ्यास व संशोधन करावे लागेल. हवामान बदलाच्या परिणामांवर अचूक उपाययोजना सुचवाव्या लागतील. आत्महत्या होऊच नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजावे लागतील. विभागीय आणि जिल्हास्तरावर अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करावा लागेल. शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधावा लागेल.*

*नुकसानभरपाई दिली की संपले, असे मानण्याचा हा विषय नाही. शेतकर्याचे कशा पद्धतीने सक्षमीकरण करता येईल, हे पाहावे लागेल. कृषी विभागातील वेगवेगळ्या योजनांची सांगड सरकारच्या इतर विभागांच्या उपक्रमांशी घालून, उत्पादन आणि उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करावे लागतील. आत्महत्या रोखण्यासाठी यापूर्वीच्या अनेक समित्यांनी आजवर सुचवलेल्या उपायांचा, अहवालांचा अभ्यास करून हे नवे कृतिदल बदलत्या काळानुसार गरजेच्या उपाययोजना अधिक व्यापकपणे राबवणार आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा लागेल. मराठवाडा आणि विदर्भात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सरकारकडून एक विशिष्ट आर्थिक रक्कम मिळते. 'वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन'अंतर्गत सर्व गरजू शेतकर्यांना अन्नसुरक्षा योजना, आरोग्यसुविधा तसेच 'राजीव गांधी जीवनदायी योजने'चा लाभ दिला जातो. जलयुक्त शिवार, मनरेगा अंतर्गत कामांचा शेतकर्यांना लाभ मिळत असतो; परंतु अनेकदा कर्ज वसुलीसाठी सावकार तसेच बँकांचा ससेमिरा सुरू होतो आणि दडपणातून शेतकरी तणावामुळे आत्महत्येकडे वळतो. या वाढत्या आत्महत्यांची अचूक माहिती पुढे येऊ न देण्याबरोबरच व्यसनाधीनतेमुळे शेतकरी आयुष्य संपवत आहेत, कर्ज घेऊन लग्नादी सोहळ्यांवर उधळपट्टी केली जाते, असे बेछूट आरोप काही जण करतात. माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी 'शेतकरी कर्ज घेतात आणि परतफेडीसाठी दहा वर्षांची वाट पाहतात,' तसेच 'भिकारी शासन आहे, शेतकरी नव्हे,' अशी वादग्रस्त वक्तव्ये केली होती. वास्तविक बळीराजा कष्टाळू आणि प्रामाणिक आहे. तो परिस्थितीची शिकार बनतो. अनेकदा तो सावकारी शोषणाचा बळी ठरतो. बँकेचे व सरकारी अधिकारी त्याला खेटे मारायला लावतात.*

*मुळात सातत्याने तोट्याच्या शेतीतून होणारी आर्थिक कुचंबणा हे आत्महत्यांचे प्रमुख कारण आहे. शेतीला सिंचन, विजेचा अनुभव, निकृष्ट दर्जाच्या महागड्या निविष्ठा, पेरणी हंगामात संस्थात्मक कर्जपुरवठ्याचा अभाव, बेहिशेबी कर्जाचे सावकारी पाश व त्याच्या वसुलीसाठीचा तगादा, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी पीकहानी, सक्षम विमा संरक्षण देण्यात सरकारला आलेले अपयश, घटती उत्पादकता, बाजारात मिळणारा कमी भाव ही शेती आतबट्ट्यात असण्याची कारणे आहेत. शेतमालाच्या आयात-निर्यातीबाबत शेतकर्यांना मारक ठरणार्या धोरणांचा अवलंब सरकारने करता कामा नये. वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये जमीन जाते आणि त्याची समाधानकारक नुकसानभरपाई वेळेवर मिळत नाही. खरे तर, पिकांची लागवड करण्यापासून काढणीपर्यंत जागतिक स्तरावरील प्रगत शेती तंत्र शेतकर्यांना मिळायला हवे. नैसर्गिक आपत्तीमुळे तसेच वन्यप्राण्यांकडून शेतीचे नुकसान झाल्यास त्वरित नुकसानभरपाई मिळायला हवी. शेतकर्यांना वेळेत आणि पुरेसे कर्ज बँकांकडून मिळाले पाहिजे.*

*उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी जोडव्यवसाय आणि प्रक्रिया उद्योगाची साथ मिळाली पाहिजे. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था केवळ शेतीवर आधारित असून चालणार नाही. शेतीवर अवलंबून असणार्यांची संख्या कमी करून, तरुणांना इतर उद्योग-व्यवसायांत गुंतवावे लागेल. शेतमालास रास्त दर मिळणे, हा शेतकर्यांचा मूलभूत अधिकार आहे. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी केवळ कर्जमाफी करून चालणार नाही, तर ठोस उपाय योजले पाहिजेत. त्यासाठी सरकारी पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नाला गती द्यावी लागेल. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत जबाबदारीची अधिक जाणीव निर्माण करावी लागेल. कृषी खात्यातील भ-ष्टाचाराचे निर्मूलन करावे लागेल. कुठल्याही परिस्थितीत शेतकरी एकटा नाही, जगाच्या पोशिंद्यामागे आम्ही उभे आहोत, असा दिलासा सरकारकडून दिला गेला पाहिजे. त्यादृष्टीने पाऊल उचलले जात आहे, ही स्तुत्य बाब. तसेच योजनांची अंमलबजावणीही चोख होणे आवश्यक आहे. नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, सयाजी शिंदे, आमिर खान यांच्यासारखे कलावंत शेतकर्यांसाठी धडपड करताना दिसतात. समाजातील अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांनी आत्महत्या रोखण्याच्या कामात पुढे आले पाहिजे. ही सामूहिक जबाबदारी मानून काम झाले, तरच काही शेतकरी हिताचे घडू शकेल.*

# कोबीवरील असा रोग ज्यामध्ये गड्डा किंवा कोबी तयार होत नाही, जाणून घ्या सविस्तर




**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक**

कोबीवर्गीय पिकांमधील (फुलकोबी, कोबी) 'ब्लाइंडनेस' किंवा वांझ रोप ही एक शारीरिक विकृती आहे, ज्यामध्ये रोपाच्या मध्यवर्ती भागातील वाढ खुंटते किंवा शेंडा तुटतो, ज्यामुळे गड्डा किंवा कोबी तयार होत नाही. या रोगाची आणखी काय कारणे आहे, त्यावर उपाय काय हे पाहुयात...

**कोबीवर्गीय पिके ब्लाइंडनेस (वांझ रोप)**

ही विकृती कोबी, फ्लॉवर आणि ब्रोकोलीवर आढळून येते. रोपाचा शेंडा विकसित होत नाही. कमी तापमान, शेंडा खुडला गेल्यास किंवा कीड-रोगांमुळे त्याला इजा झाल्यास अशा रोपाला गड्डा धरत नाही. रोपांची पाने रुंद, मोठी, गडद हिरवी आणि जाडसर राठ असतात.

**उपाययोजना**

लागवडीसाठी निरोगी जोमदार आणि शेंडा असलेली रोपे निवडावीत.रोपांची पुनर्लागवडीच्या वेळी काळजीपूर्वक हाताळणी करावी.कमी तापमान असल्यास पुनर्लागवड टाळावी. योग्य तापमानात करावे.

वांझ रोपे शेतातून काढून टाकून त्यांचा त्वरित नायनाट करावा.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन सेवा केंद्र, इगतपुरी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

# त्याला धोतर नीट नेसता येत नाही रे तो काय..

## संजय राऊतांनी कोश्यारींवर चांगलाच बार काढला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ मुंबई–** शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याविरूद्ध कडक शब्दात टीका केली. भगतसिंह कोश्यारी यांनी राज ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदींना एवढा का घाबरत आहेत असे वक्तव्य केलं होतं. त्याला आता संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिलं असून त्यांनी ज्याला धोतर नीट नेसता येत नाही रे तो काय आम्हाला अक्कल शिकवतोय असं वक्तव्य केलं. राऊत यांनी मोदींना कोण घाबरतंय असं म्हणत राहुल गांधी यांच्या संसदेतील कालच्या भाषणाचा संदर्भ देखील दिला.

संजय राऊत यांना पत्रकारांनी राज्याचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राज ठाकरेंवर केलेल्या टीकेबाबत प्रश्न विचारला. त्यावेळी, चिडलेल्या संजय राऊत यांनी, 'अरे त्याला धोतर नीट नेसता येत नाही तो काय आम्हाला अक्कल शिकवतोय... तुम्ही बघा त्याला समोरून, त्याचं धोतर कसं असतं ते...' असं वादग्रस्त वक्तव्य केलं.

राऊत पुढे म्हणाले, 'जो स्वतः धोतर नीट नेसू शकत नाही तो ठाकरेंना सांगतोय की मोदींना घाबरू नका म्हणू, मोदींना कोण घाबरतंय. काल राहुल गांधीनी संसदेत सांगितलं आहे ना... डोळ्यात डोळे घालून अमित शहा अन् नरेंद्र मोदी यांच्याबरोबर बोलण्याची हिंमत आमच्यात आहे. राहुल गांधींचे भाषण सुरू असताना अमित शहा आणि पंतप्रधानांनी संसदेतून पलायन केलं.

राऊत यांनी तुमच्या हातामध्ये एजन्सी आणि सत्ता आहे म्हणून आम्हाला सांगताय. धोतर आधी नीट नेसायला शिका आणि मग महाराष्ट्रात येऊन आम्हाला अक्कल शिकवा. यानंतर राऊत यांनी बोलताना कोश्यारींविरूद्ध एक वादग्रस्थ शब्दप्रयोगही केला.

# पोटभर जेवल्या नंतरही भूक लागतेय?



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

अनेकदा पुरेसे जेवण करूनही थोड्याच वेळात पुन्हा भूक लागल्याची जाणीव होते. याचे मुख्य कारण तुमची इच्छाशक्ती नसून तुमच्या आहारातील चुकीची निवड असू शकते.




काही पदार्थ वरवर आरोग्यदायी वाटत असले तरी, ते शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढवतात किंवा कमी करतात. यामुळे भूक अधिक तीव्र होते. हे पदार्थ खाल्ल्यानंतर पोट भरल्याची भावना निर्माण होण्याऐवजी शरीरात 'इन्सुलिन स्पाईक्स', संप्रेरकांचे असंतुलन आणि ऊर्जेची पातळी अचानक कमी होणे असे प्रकार घडतात. परिणामी, शरीर वारंवार अन्नाची मागणी करू लागते. अन्नातून खरी तृप्ती मिळवण्यासाठी फायबर, प्रोटिन आणि हेल्दी फॅट यांचे योग्य संतुलन असणे अत्यंत आवश्यक आहे. हे संतुलन बिघडते, तेव्हा शरीराला लवकर पुन्हा भूक लागते.

फळांचा रस हे आरोग्यासाठी उत्तम मानले जात असले तरी, जेव्हा आपण फळांचा रस पितो तेव्हा त्यातील फायबर पूर्णपणे निघून गेलेले असते. रसामध्ये असलेल्या नैसर्गिक साखरेमुळे रक्तातील साखरेची पातळी लगेच वाढते आणि तितक्याच वेगाने ती खाली येते. यामुळे काही वेळातच पुन्हा तीव्र भूक लागते आणि गोड खाण्याची ओढ निर्माण होते. व्हाईट ब्रेड हा रिफाईंड कार्बोहायड्रेटस्पासून बनलेला असतो. यामुळे पोट भरल्याची जाणीव करून देणारे सॅटायटी हार्मोन्स सक्रिय होऊ शकत नाहीत. म्हणूनच ब्रेड खाल्ल्यानंतर अवघ्या काही वेळातच पुन्हा भूक जाणवू लागते.

बाजारात मिळणारे 'फ्लेवर्ड योगर्ट' हे प्रथिनांच्या बाबतीत कमकुवत आणि साखरेच्या बाबतीत वरचढ असतात. यातील साखरेचे जास्त प्रमाण 'इन्सुलिन स्पाईक्स' निर्माण करत असल्यामुळे अन्नाची ओढ आणि भूक वाढते. त्याऐवजी साधे दही खाणे हा केव्हाही उत्तम पर्याय ठरतो. सकाळच्या न्याहारीसाठी वापरले जाणारे बहुतेक 'ब्रेकफास्ट सीरिअल्स' हे 'अल्ट्रा प्रोसेस्ड' असतात. यामध्ये फायबरचे प्रमाण नगण्य असते. सकाळी उठल्यानंतर लगेच असे पदार्थ खाल्ल्याने इन्सुलिन वेगाने वाढते, ज्यामुळे दिवसाची सुरुवात भूक आणि थकव्याने होऊ शकते.भूक नियंत्रित ठेवण्यासाठी अख्खी धान्ये आणि संपूर्ण फळे खाण्यावर भर द्यावा. प्रथिनांचे पुरेसे सेवन आणि प्रक्रिया केलेल्या अन्नापासून दूर राहिल्यास केवळ भूक संतुलित राहत नाही, तर वजन आणि ऊर्जेची पातळी देखील सुधारते. आरोग्याशी संबंधित अधिक माहितीसाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही हिताचे ठरते.

# आता शिधा पत्रिका होणार 'स्मार्ट'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**



राज्यातील नागरिकांना नवीन क्यूआर कोडयुक्त स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यास महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना या स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्यात येणार आहेत. यासाठी सुमारे ४८ कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे.

सध्याच्या कागदी शिधापत्रिका वर्ष–सहा महिन्यांत खराब होतात. कागदी शिधापत्रिकेच्या गैरवापराच्या तक्रारी वाढत असल्यामुळे राज्य सरकारने स्मार्ट शिधापत्रिकांचा निर्णय घेतला आहे. या शिधापत्रिकांवर नवीन क्यूआर कोड असेल. त्यामुळे लाभार्थ्यांची ओळख अधिक सुरक्षित व पारदर्शक होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकिशिवाय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या मंजुरीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. खरेदी प्रक्रिया महाऑनलाईन ई–निविदा प्रणालीद्वारे पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे.

# बांग्लादेशी फेरीवाले मुंबईतून हद्दपार करू

## अतिक्रमणाविरोधात मोहीम; पाणी, पूर, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातही मोठ्या घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१२मुंबई–** मुंबईतील रस्ते, पदपथावर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून बसलेल्या बांग्लादेशी फेरीवाल्यांवर यापुढे कठोर कारवाई करून मुंबईकरांसाठी पदपथ मोकळे करणार असल्याची ग्वाही मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी दिली.महापौरपदावर विराजमान झाल्यावर केलेल्या भाषणात महापौर तावडे म्हणाल्या की, बेकायदेशीर बांगलादेशींना मुंबईतून हटवणे हेच भाजप,शिवसेना आणि आरपीआयचे महत्त्वाचे उद्दिष्ट असेल. त्याकरता आम्ही डिजिटल सिस्टीम आणि एआयचा वापर करू. पदपथांवर अनधिकृतरित्या अतिक्रमण केलेल्या बांगलादेशींचे जात प्रमाणपत्र व बोगस आधार कार्ड शोधून त्यावर त्वरित कारवाई करू, अशी घोषणा महापौरांनी केली. पाणीपुरवठा, अग्निशमन दल, सार्वजनिक शौचालय, पार्किंग, पाणीपुरवठा प्रकल्प, वैद्यकीय सुविधा, मुंबईत निर्माण होणारी पूरपरिस्थिती, महापालिका शाळांचा दर्जा, गावठाणांचा विकास, पर्यावरणीय आराखडा,खड्डे अशा विविध मुद्द्यांना महापौरांनी स्पर्श केला.

**टँकर माफियाफ्री मुंबईचे धोरण –** दरवर्षी होणाऱ्या पाणीपट्टीतील दरवाढीपासून मुंबईकरांची सुटका होणार आहे. दरवर्षी होणाऱ्या ८% पाणी दरवाढीला स्थगिती देऊन ,पाण्याचे दर स्थिर ठेवण्याकरता प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर टँकर माफीयांचे वाढलेले प्रस्थ आणि त्यांची मक्तेदारी बंद करण्याकरता टँकर माफिया फ्री मुंबई, हे धोरण राबविण्यात येईल.

**खड्ड्यांसाठी उपाय –**सतत पडणाऱ्या खड्ड्यांवर तोडगा काढण्यासाठी मुंबईमध्ये युटिलिटी टनेल बनवण्यात येतील नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते डांबरी आणि नऊ मीटरपेक्षा जास्त रुंदीचे रस्ते करण्यात येतील पादचारीस्नेही व टिकाऊ बनवण्यासाठी सर्व काँक्रीटमध्ये विकसित केले जातील. पार्किंगची क्षमता वाढवण्यासाठी भुयारी व जमिनीवरील पार्किंगची निर्मिती करण्यात येईल.

**आरोग्यासाठी विशेष हेल्पलाइन –** ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य विषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी विशेष हेल्पलाइन सुरू करण्याचा मानस असून ७५ वर्षे ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑन कॉल रुग्णवाहिका व रुग्णांच्या निवासस्थानी डॉक्टर तपासणी व्हावी याकरिता उपाययोजना केल्या जातील. प्रत्येक प्रशासकीय विभागात डायलिसिस सेंटर आणि केमोथेरपी सेंटर उभारण्याचा प्रयत्न असेल.ज्येष्ठ नागरिकांना पालिकेच्या रुग्णालयातून वर्षातून एकदा मोफत पूर्ण शरीर तपासणी उपलब्ध करून दिली जाईल. हृदयविकाराच्या रुग्णांसाठी रुग्णालयांमध्ये प्लास्टिक आणि बायपास सर्जरी सवलतीच्या दरात उपलब्ध होईल.

# जिल्हाधिकारी यांच्या ३०० कोटी रुपये अतिरिक्त मागणीला मुख्यमंत्री यांचा सकारात्मक प्रतिसाद

## राज्य नियोजन समितीची बैठक संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१२अमरावती–** राज्य नियोजन समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथून जिल्हाधिकारी आशिष येरेकर दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तीनशे कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार सुलभा खोडके यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, उपवनसंरक्षक अजुर्ना के. आर, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी यावेळी जिल्ह्यातील विविध विभागांची माहिती, त्यांची चालू कामे, सद्यस्थिती तसेच भविष्यकालीन नियोजनाबाबत अभ्यासपूर्ण माहिती सादरीकरणाव्दारे सविस्तर दिली. अमरावती जिल्ह्यात १४ तालुके आहेत. यामुळे विकास कामांसाठी अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत विकास कामांसाठी जिल्ह्याला अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. सन २०२५ –२६ जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यानुसार ५२७ कोटी रुपयांची विकास कामे सुरु आहेत. सन २०२६ –२७ साठी ४३४. ७१ कोटी रुपयांचे स्पिलिंग दिले आहेत. त्यानुसार आराखड्याचे काम करण्यात आले आहे. परंतु यामध्ये अतिरिक्त ३०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे श्री. येरेकर यांनी यावेळी मागणी केली. जिल्ह्याच्या विकासासाठी तालुका हा घटक महत्त्वपूर्ण आहे.जिल्ह्यातील लोकसंख्या, तालुक्यांची संख्या, भौगोलिक क्षेत्रफळ याचा विचार करून अतिरिक्त निधीच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आग्रही भूमिका मांडली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून जिल्ह्याच्या विकासासाठी अधिक उत्तम काम करणाऱ्यास निधीची कमतरता पडणार नसल्याचा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या मागणीनुसार जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये वाढीव निधी प्राप्त होणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील प्रलंबित विकासकामांना आता नवी उभारी मिळणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्याकडे आमदार श्रीमती खोडके यांनी सन २०२६ –२७ साठी मनपा अंतर्गत विविध विकास कामांसाठी १०० कोटी रुपये अतिरिक्त निधीची विशेष मागणी केली. जिल्ह्यामध्ये मनपाच्या ६३ शाळा आहेत. मनपा शाळेच्या दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा नियोजन समिती आराखड्यात नवीन लेखाशीर्ष समाविष्ट करण्याबाबतची मागणीही त्यांनी यावेळी केली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# वडाळी, काँग्रेस नगरात दोन सावकारांवर छापा

## १९ दस्तावेज, कोरे धनादेश, मालमत्तेची खरेदीखते जप्त

## जिल्हा उपनिबंधकांच्या नेतृत्वात मोठी कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

शहरातील अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने मंगळवारी वडाळी आणि काँग्रेस नगर परिसरात दोन ठिकाणी छापे टाकले. या धडक कारवाईत अवैध सावकारीशी संबंधित संशयास्पद कागदपत्रे, कोरे धनादेश आणि स्थावर मालमत्तेचीखरेदीखते जप्त करण्यात आली असून, सावकारी पाशात अडकलेल्यांच्या तक्रारींवरून हे पाऊल उचलण्यात आले आहे.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, दर्यापूर यांच्या कार्यालयाला प्राप्त झालेल्यातक्रारींच्या आधारे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी या कारवाईचे आदेश दिले होते. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गगलानी नगर (वडाळी) आणि काँग्रेसनगर येथे १० फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. सहकार विभागाने या कारवाईसाठी दोन स्वतंत्र पथके नियुक्त केली होती. वडाळी परिसरात सहायक निबंधक किशोर बलींगे यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने गगलानी नगरमधील शक्तीसिंह विरेंद्र दीक्षीत यांच्याकडे सकाळी ११:५५ ते दुपारी २:३५ या वेळेत झडती घेतली. या ठिकाणी ५ संशयास्पद दस्तऐवज, २ कोरे धनादेश आणि मालमत्तेचे खरेदीखते हस्तगत करण्यात आले.

काँग्रेस नगर परिसरात सहायक निबंधक किशोर इंगळे (चांदूर रेल्वे) यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सुमंत अरविंद पाटील यांच्या निवास्थानी छापा टाकला. येथे सर्वाधिक १४ संशयास्पद दस्तऐवज आणि २ कोरे धनादेश मिळून आल्याची माहिती आहे.



### कायद्याचा बडगा

जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी आता 'महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' मधील तरतुदींनुसार केली जाणार आहे. ही संपूर्ण कारवाई विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार आणि सहायक निबंधक गजानन डाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.अवैध सावकारी करणाऱ्यांविरुद्ध प्राप्त तक्रारींची खातरजमा करून ही कारवाई करण्यात आली आहे. जप्त कागदपत्रांच्या आधारे पुढील चौकशी केली जाईल. असे सहकार विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# वलगावमध्ये गोवंशावरून दोन गटात जोरदार संघर्ष

## वाहन अडवून दगडफेक, तोडफोड, मारहाण





### परिसरात तणाव, पाच आरोपींना घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२वलगाव**–बुधवारी संध्याकाळी उशिरा वलगाव पोलिस स्टेशन परिसरात गोवंशावरून दोन गटांमध्ये जोरदार वाद झाला. वाद एवढा वाढला की काही लोकांनी वाहन अडवून, दगडफेक आणि तोडफोड केली. या घटनेनंतरदोन्ही समुदायातील लोक मोठ्या संख्येने ते एकमेकांशी भिडले. त्यामुळे परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. माहिती मिळताच वलगाव पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि गर्दीला पांगवण्यासाठी सौम्यबळाचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी अतिरिक्त सुरक्षा तैनात केली आहे आणि परिसरात पेट्रोलिंग वाढवली आहे.आरोपीने चालकावर हल्ला शिवीगाळ केली आणि धमकी दिल्याचे वृत्त आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे आणि इतर वरिष्ठ अधिकारी देखील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. पटावरून जनावरे परत आणत होते वृत्तानुसार, वलगाव पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी शेख उमर शेख नवाब (३२) हे दरवर्षीप्रमाणे बुधवारी तीन गुरांसह दर्यापूरला गेले होते. परत येत असताना, बडगावपॉवर हाऊस जवळ मोटारसायकलवरून आलेल्या काही गोरक्षक संबंधित पावत्या आणि कागदपत्रांची मागणी करत समितीच्या कार्यकत्यांनी त्यांना थांबवले. गुरांशी संबंधित व्यक्तींनी वाद घातल्याचा आरोप आहे, वाद वाढल्याने हाणामारी झाली आणि प्रकरण हिंसक वळणावर पोहोचले.घटनेनंतर परिसरात तणाव वाढू लागला. पोलिसांनी घटनास्थळी जमलेल्या लोकांना घरी परतण्याचे आवाहन केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत तपास सुरू होता. वलगाव पोलिसांनी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे आणि पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांची कठोर चौकशी सुरू आहे.

काही काळातच सन्नाटा

घटनेनंतर परिसरात अफवा पसरल्या, परंतु – जनतेला शांत करण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त – तैनात करण्यात आला. पोलिसांची गस्त – वाढवल्यानंतर, परीसरात लवकरच शांतता पसरली. पोलिसप्रशासनाने नागरिकांना अफवांकडे दुर्लक्ष करून शांतता राखण्याचे आवाहन केले.

# भटक्यांमुळे शहरात अपघातांची मालिका

### व्यापाऱ्यांची मनपा व पोलिसांकडे पुन्हा कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

स्थानिक मालवीय चौक परिसरात भटक्या नागरिकांच्या वाढत्या वावरामुळे वाहतूक कोंडी व अपघातांच्या घटना वाढत असल्याचा आरोप स्थानिक व्यापाऱ्यांनी केला आहे. सहकार भवनसमोर बुधवारी दुपारी झालेल्या अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर परिसरातील व्यापाऱ्यांनी महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडे तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी पुन्हा एकदा केली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून मनपा आयुक्त आणि संबंधित विभागांकडे निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. यापूर्वी सप्टेंबर व नोव्हेंबर महिन्यातही भटक्यांच्या पुनर्वसनाबाबत विनंती करण्यात आली होती. मात्र परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.भटके कुटुंबे मालवीय चौक ते जयस्तंभ मार्ग परिसरात तळ ठोकून राहत असल्याने रस्त्यावर अनधिकृत गर्दी होते. काही जण पार्किंगच्या जागेचा वापर वास्तव्यासाठी करत असल्यामुळे वाहनचालकांना अडथळा निर्माण होतो.परिणामी वाहतूक विस्कळीत होत असून सुरक्षा समस्याही वाढत आहेत. चोरी, तोडफोड आणि अवांछित प्रकारांची भीतीही व्यक्त केली जात आहे.बुधवारी दुपारी झालेल्या अपघातात गर्दीमुळे रुग्णवाहिकेला मार्ग काढण्यात अडचणी आल्याचे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले. संबंधित जखमीवर उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांनी भटक्यांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करून परिसरातील वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्था सुरळीत ठेवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# महानगरपालिकेत मालमत्ता कर वसुली संदर्भात आढावा बैठक

## शासकीय विभागांनी मालमत्ता कर तातडीने भरावा – आयुक्त सौम्या शर्मा यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉल येथे मालमत्ता कर वसुली संदर्भात सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस शहरातील विविध शासकीय विभागांचे विभागप्रमुख, प्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.महानगरपालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीची सद्यस्थिती, प्रलंबित कराची रक्कम तसेच शासकीय विभागांकडील थकबाकीचा सखोल आढावा यावेळी घेण्यात आला. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले की, शहरातील स्वच्छता व्यवस्था, रस्ते दुरुस्ती,



प्रकाशयोजना, आरोग्य सेवा तसेच इतर नागरी सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते आणि या निधीचा मुख्य स्रोत म्हणजे मालमत्ता कर होय.बैठकीदरम्यान आयुक्तांनी शासकीय विभागांनी त्यांच्या ताब्यातील इमारती व मालमत्तांवरील प्रलंबित मालमत्ता कर तात्काळ अदा करावा, तसेच पुढील काळात नियमितपणे कर भरण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश दिले. शासकीय विभागांनी आदर्श निर्माण करून कर भरण्यात पुढाकार घेतल्यास खासगी संस्था व नागरिकांनाही सकारात्मक संदेश जाईल, असे त्यांनी अधोरेखित केले.आयुक्तांनी विभागांकडून येणाऱ्या अडचणींची सविस्तर माहिती घेत संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तसेच विभागांदरम्यान समन्वय वाढवून कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना दिल्या.महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर वसुली मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रलंबित थकबाकी वसूल करून आर्थिक शिस्त प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला. आयुक्तांनी सर्व विभागांना ठराविक कालमर्यादेत कर भरण्याचे नियोजन सादर करण्याचे निर्देश दिले.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिकेला शासकीय विभागांचे सक्रिय सहकार्य अत्यावश्यक असून, सकारात्मक प्रतिसादातून महसूल वाढीस चालना मिळेल, असा विश्वास आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी व्यक्त केला.या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, वसुली लिपिक, विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री आवास योजनेबाबत तक्रारींसाठी महापौरांचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

अमरावती महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा तक्रारी असल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केले आहे.प्रधानमंत्री आवास योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी व्हावी यासाठी अमरावती महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असून लाभार्थ्यांना सुलभ सेवा देण्यावर भर देण्यात येत आहे.तथापि, अर्ज प्रक्रियेतील अडथळे, मंजुरीतील विलंब, बांधकामासंबंधी समस्या किंवा इतर कोणत्याही तक्रारी असल्यास नागरिकांनी विलंब न लावता थेट महापौरांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत व योग्य पद्धतीने मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कोणत्याही प्रकारची गैरसोय सहन केली जाणार नाही, असे ठाम मत व्यक्त करत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी नागरिकांना पुढे येऊन तक्रारी नोंदविण्याचे आवाहन केले आहे.महानगरपालिका नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करून योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# शहरातील ठाणेदारांच्या लवकरच बदल्या !

## फ्रेजरपुरा आणि राजापेठचे ठाणेदार जैसे थे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**



काही अधिकाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झालाआहे. त्यामुळे त्यांच्या बदल्या होतील. तसेच अन्य काही ठाणेदारांच्या सुध्दा बदल्या करण्याचा निर्णय तिन्ही पोलीस उपायुक्त आल्यानंतर केला जाईल.

– **राकेश ओला**, पोलीस आयुक्त, अमरावती.

पोलीस आयुक्तालयात लवकरच अधिकाऱ्याच्या बदल्या होणार असून फ्रेजरपुरा आणि राजापेठचे ठाणेदार जैसे थे राहणार आहेत. त्यामुळे कोणत्या पोलीस स्टेशनला कोणते नवीन ठाणेदार मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्ताचा पदभार घेतल्यानंतर दोन वेळा गुन्हे विषयक आढावा बैठक घेऊन अधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना दिल्या होत्या. तसेच शहरात कुठल्याच प्रकारचे अवैध धंदे सुरू राहणार नाहीत आणि एमडी, गांजा आणि अन्य अवैध धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाप्रमाणे शहरातील काही अवैध धंदे बंद आहेत. परंतु शहरात काही ठिकाणी वरली मटका धंदा सुरू आहे.त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकासह संबंधित ठाण्याचे कर्मचारीसुध्दा कारवाई करीत आहेत. परंतु तरीसुध्दा शहरातील अवैध धंदे बंद होत नाही आणि पाहिजे त्याप्रमाणे पोलीस स्टेशनला कामे होत नाही, असा ठपका ठेवत आणि काही अधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला आल्याने आयुक्तालयातील ठाणेदारांच्या बदल्या करण्याचा निर्णय पोलीस आयुक्तांनी घेतला आहे. यामध्ये राजापेठ व फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन वगळता आठ पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्या होतील, अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. तसेच काही महत्वाच्या शाखेच्या अधिकाऱ्यांच्या सुध्दा बदल्या होणार असल्याची माहिती आहे. बुधवारीच अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार होत्या, परंतु पोलीस उपायुक्त (मुख्यालय) रजेवर असल्यामुळे ते शहरात येताच गुरुवारी किंवा शुक्रवारी अधिकाऱ्यांच्या बदल्या होण्याची शक्यता आहे.

# तरुणाची हत्या करून मृतदेह जाळला

## मृताची ओळख पटली नाही, अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२पथ्रोट–** एका तरुणाची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह जाळण्यात आला. ही घटना बुधवारी, ११ फेब्रुवारीला सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास पथ्रोट ठाण्याच्या हद्दीतील जहानपूर शिवारात उघडकीस आली. मृतकाची ओळख अद्याप पटली नसून, त्यादृष्टीने पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मौजे जहानपूर शेतशिवाराला लागून शहानूर धरणावरून खोडगाव पांढरीकडे जाणाऱ्या कालव्यालगत नितीन केशवराव बडवाईक यांच्या मालकीचे शेत आहे. हेत शेत जनार्दन गभने हे लागवणीने करीत आहेत. ते बुधवारी सकाळी पिकांवर फवारणीसाठी शेतात गेले होते. त्यावेळी त्यांना शेताजवळील कालव्यामधून धूर निघताना दिसला. इतक्या सकाळी कोणी काय पेटवले, हे पाहण्यासाठी त्यांनी धूर निघत असलेल्या ठिकाणी जाऊन बघितले. त्यावेळी कालव्याच्या मधल्या विहिरी सारख्या खड्ड्यात एक




मृतदेह जळत असल्याचे त्यांना दिसले. हा प्रकार पाहून त्यांनी याबाबत वाघडोहचे पोलिस पाटील सुभाष काकड यांना माहिती दिली. त्यानंतर घटनेची माहिती पथ्रोट पोलिसांना दिली. माहिती मिळताच ठाणेदार अभय चौथनकर यांनी पथकासह घटनास्थळ गाठून पंचनामा केला. अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांनीही घटनास्थळ गाठून पाहणी केली. यावेळी फॉरेन्सिकच्या चमूलाही घटनास्थळी पाचारण केले. घटनास्थळाच्या पंचनाम्या दरम्यान तेथे वाहनाच्या टायरच्या खुणा व ऑइलचे डाग दिसले.

# अमरावती पोलीस भरती: पहिल्या दिवशी २२५ उमेदवार गैरहजर

## ८०० पैकी ४९ जण अपात्र ठरले, २१४ जागांसाठी २१ हजार अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती** –अमरावती येथील पोलीस कवायत मैदानावर बुधवारपासून सुरू झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेत पहिल्याच दिवशी ८०० पैकी २२५ उमेदवार गैरहजर राहिले. उपस्थित ५७५ उमेदवारांपैकी ४९ जण कागदपत्र पडताळणी आणि शारीरिक चाचणीदरम्यान अपात्र ठरले. जिल्ह्याच्या ग्रामीण पोलीस दलात २१४ जागा रिक्त असून, त्यासाठी राज्यभरातून तब्बल २१ हजार २०६ उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज दाखल केले आहेत.या भरतीसाठी पोलीस विभागातर्फे सर्व अर्जदारांना बोलावणे पाठवण्यात आले आहे. आजच्या पहिल्या दिवशी ८०० उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी आणि कागदपत्रांची पडताळणी नियोजित होती. गेल्या वर्षभरापासून अनेक तरुण-तरुणी या भरतीसाठी तयारी



करत होते. एका जागेसाठी सरासरी ९९ उमेदवारांनी अर्ज केले असून, यामध्ये बारावी उत्तीर्ण ते उच्चशिक्षित उमेदवारांचा समावेश आहे.

भरती प्रक्रियेनुसार, ११ ते २३ फेब्रुवारीदरम्यान पुरुष उमेदवारांच्या तर २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान महिला उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी आणि शारीरिक चाचण्या घेतल्या जाणार आहेत. सर्व उमेदवारांच्या शारीरिक चाचण्या पहाटे ५ वाजतापासून सुरू होतील. एकूण अर्जदारांमध्ये १६ हजार २८६ पुरुष आणि ४ हजार ९२० महिलांचा समावेश आहे.भरती प्रक्रिया नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी, सुरुवातीला दररोज ८०० उमेदवारांना बोलावले जात असले तरी, शुक्रवारपासून दररोज २ हजार उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी पाचारण करण्यात येणार आहे. जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी या माहितीला दुजोरा दिला असून, २६ फेब्रुवारीपर्यंत संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी हे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

# कंटेनरसह ३६ लाखांचा बनावट मद्यसाठा जप्त, स्टिकर जप्त

## अंड्ड्यांच्या ट्रे आडून वाहून नेण्यात येत होता देशी -विदेशी मद्यसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२यवतमाळ-** गोवा, मध्य प्रदेश या परराज्यात निर्मित आणि महाराष्ट्राची एक्साइज ड्युटी बुडवुन विक्री करण्यात येत असलेला तब्बल ३६ लाख रुपये किमतीचा बनावट देशी-विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास यवतमाळ-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या राळेगाव ते अल्लीपूर मार्गावरील कमळनेर फाट्यावर केली. या कारवाईने अवैध मद्य विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

वर्धा येथून बनावट मद्यसाठा कंटेनरमध्ये येत असल्याची गोपनीय माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाला मिळाली. या माहितीवरून राज्य उत्पादन शुल्क यवतमाळच्या अधिकारी, कर्मचारी यांनी विभागीय भरारी पथकासह राळेगाव ते अल्लीपुर मार्गावरील कमळनेर फाट्यावर सापळा रचला. वर्धेकडून यवतमाळकडे येत असलेल्या एका १० चाकी कंटेनर क्रमांक एमएच ०४ एचडी ०२९८ ला आणि त्याच्या मागे असलेल्या टाटा कंपनीच्या एमएच ३० बीडी ३८८१ क्रमांकाच्या वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी दोन्ही वाहनांचे चालक अंधारात पसार झाले. त्यात कंटेनरमध्ये अड्ड्यांच्या कागदी ट्रेच्या गठ्ठ्यांच्या मागे लपवुन मद्यसाठा






वाहुन नेण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. यावेळी कंटेनरमधून गोवा आणि मध्य प्रदेश राज्यात निर्मित आणि एक्साइज ड्युटी बुडवुन महाराष्ट्रात आलेला बनावट देशी-विदेशी मद्याचा तब्बल ६१३ पेटी साठा आढळुन आला. त्याचप्रमाणे दुसऱ्या टाटा वाहनातुन देशी मद्याचे ३० पेटी जप्त करण्यात आल्या. या कारवाईमध्ये सुमारे ७० लाख रुपये किमतीची तीनही वाहने आणि ३६ लाख रुपये किमतीचा देशी-विदेशी मद्याचा साठा असा एकुण १ कोटी ५ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही तीनही वाहने आणि जप्त मद्याचा साठा उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात आणण्यात आला. या कारवाईची माहिती मिळताच उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांनी यवतमाळमध्ये भेट दिली.

पकडलेल्या तिसरे वाहनात ४० मद्यपेट्या ही कारवाई सुरू असतानाच एका कार क्रमांक एमएच २९ बीव्ही ७२२७ त्या ठिकाणी मद्यसाठा घेण्यासाठी दाखल झाली होती. मात्र कारवाई पाहुन त्यांनी वर्धेकडे पळुन जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या वाहनाचा पाठलाग करुन करुन त्याला वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर थांबवण्यात आले. या वाहनाचा चालक देखील पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. त्या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये देखील देशी मद्याच्या ४० पेटी आढळुन आल्या.

या कारवाईमध्ये यवतमाळ, वर्धा, नागपूर या तीन जिल्ह्यातील उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. त्यासोबतच अमरावती येथील विभागीय भरारी पथकही सहभागी होते. ही कारवाई अमरावतीचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर, अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक पी. एस. बोढारे, दिवाकर वाघ, मुकुंद चिटमटवार, धर्मेंद्र त्रिपाठी, दुय्यम निरीक्षक चंद्रकांत नागुलवाड, दिलीप वल्के, निलेश वानखडे, संजय बोडेवार, सुरेंद्र बुटले, अनिल पिकले, दिपक तरसे, राजेश जायकर, सागर वानखडे, सुकेशनी शिंदे यांच्यासह कर्मचारी अविनाश पेंदोर, शंकर घाटे, अजीज पठाण, मनोहर शेंडे, सतीश घाडगे, संदीप दुधे, महेश खोब्रागडे, स्नेहा बाळबुधे, प्रवीण मसराम, अमोल बोथले, राम पवार, निखिल दहेलकर, महेंद्र रामटेके आदींनी पार पाडली.

# गंगा सावित्री निवासस्थानी उपमहापौर सचिन भेंडे यांचे जोरदार स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** युवा स्वाभिमान पार्टीचे नवनिर्वाचित उपमहापौर सचिन भेंडे यांनी गंगा सावित्री निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी भाजपा नेत्या व स्टार प्रचारक माजी खासदार श्रीमती नवनीत राणा यांनी त्यांचे औक्षण करून पुष्पगुच्छ देत आत्मीय स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी शहराचे नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवानी यांनाही मा.खा. नवनीत राणा यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. महापालिकेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव कार्य व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम केल्यास शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.या



## नवनीत राणा यांच्याकडून औक्षण करून स्वागत; महापौर तेजवानींनाही शुभेच्छा

भेटीदरम्यान सर्व मान्यवरांनी नवनिर्वाचित उपमहापौर व महापौर यांचे अभिनंदन करत शहरातील विकासकामे, नागरिकांच्या समस्या तसेच आगामी कार्याचा आढावा घेतला. सदर भेट सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली.यावेळी गटनेता नाना ऊर्फ ज्ञानेश्वर आमले, नगरसेवक प्रा. प्रशांत आनंदराव वानखडे, श्रीमती सुमती ढोके, अजय मदनमोहन जयस्वाल, किशोर चंद्रशेखर जाधव, दिपक किसनलाल साहू, श्रीमती नंदा धनंजय सावदे, सौ. रजनी राजेश डोंगरे, सौ. गौरी शैलेंद्र मेघवानी, ड. सौ. प्रिती हर्षल रेवणे, महेश धनराज मुलचंदानी, योगेश रघुनाथ विजयकर, सौ. अर्चना अशोक पांडे, सौ. प्रियंका भूषण पाटणे यांच्यासह अविनाश काळे, शुभम उंबरकर, मंगेश कोकाटे, आकाश पाटील, मुकेश वासेवाय, सचिन सोनोने, निखील वावगे आदी उपस्थित होते.

# २२ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा : अमरावती केंद्रातून 'दप्तर' प्रथम

## पाचही विजेती नाटके अंतिम फेरीत; ६७ प्रयोगांनी रंगला बालरंगभूमीचा जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२मुंबई,** २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेच्या अमरावती केंद्राचा निकाल जाहीर झाला असून विश्वास प्रतिष्ठान, अकोला यांच्या 'दप्तर' या नाटकाने प्रथम पारितोषिक पटकावले आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही घोषणा करण्यात आली.द्वितीय पारितोषिक जे.आर.डी. टाटा स्कूल अॅण्ड एडूलॅब, खडकी (अकोला) यांच्या 'वाढदिवस' या नाटकास मिळाले. तृतीय पारितोषिक अ.ब.क. नाट्य मल्टीपर्पज फाऊंडेशन, अमरावती यांच्या 'आदिबांच्या बेटावर' या नाटकाला मिळाले. चतुर्थ पारितोषिक भारवी कला अकादमी, अचलपूर यांच्या 'अबोलांचे बोल' तर पाचवे पारितोषिक कलाविष्कार बहुउद्देशीय संस्था, अमरावती



यांच्या 'बुद्धाची गोष्ट' या नाटकास जाहीर झाले. विशेष म्हणजे या पाचही नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे.स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत विविध तांत्रिक व वैयक्तिक विभागांतील पारितोषिकेही जाहीर करण्यात आली. दिग्दर्शन विभागात 'दप्तर'च्या प्रतिभा कोकमारे यांना प्रथम, 'बी पॉझिटिव्ह'च्या कल्याणी गेडाम यांना द्वितीय, तर 'झाडवाली झुंबी'च्या रितेश महल्ले यांना तृतीय पारितोषिक मिळाले. प्रकाश योजना, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा व संगीत दिग्दर्शन या विभागांतील विजेत्यांनाही गौरविण्यात आले.उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदक 'दप्तर'मधील अंकुश जैन आणि 'ती एकाकी का?'मधील अन्वी वाहाने यांना प्रदान करण्यात आले. तसेच विविध नाटकांतील बालकलाकारांना गुणवत्ता प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.दि. २५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, मेडिकल कॉलेज, अमरावती येथे ही स्पर्धा उत्साहात पार पडली. एकूण ६७ बालनाट्य प्रयोग सादर करण्यात आले. परीक्षक म्हणून श्री. सुधीर देशपांडे, श्री. हेमराज भगत व श्रीमती मिनाक्षी बोरकर यांनी काम पाहिले.सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या संघांचे तसेच पारितोषिकप्राप्त कलाकारांचे अभिनंदन करून भविष्यातही बालकलाकारांनी दर्जेदार सादरीकरण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.स्पर्धेत सहभागी सर्व संस्थांनी मेहनतीने सादर केलेल्या दर्जेदार बालनाटकांना प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाल्याने अमरावती केंद्रातील ही स्पर्धा बालरंगभूमीसाठी संस्मरणीय ठरली.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

## ५० लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य ; ४० विद्यार्थ्यांची निवड

### शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आदिवासी विकास विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती,**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत ४० पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह यांनी केले आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे :उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यायावत (२०२६ मधील) क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहीत निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

या शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निवास व भोजन खर्च, शैक्षणिक साहित्य व अनुषंगिक खर्च, विमान प्रवास खर्च, व्हीसा शुल्क, आरोग्य विमा तसेच इतर आवश्यक खर्चाचा समावेश करण्यात आला आहे. एका विद्यार्थ्यासाठी कमाल ५० लाख रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असून, दरवर्षी एकूण ४० अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

उमेदवाराच्या पालकांचे, कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२५-२६ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. विहीत निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाखापर्यंत शिथील केली जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा शिक्षण संस्थेत पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा संशोधन अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवलेला असणे आवश्यक आहे. तसेच परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या ढजएत्रङ, खएङ्ढड किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या स्वप्नांना बळ मिळते. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ४० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निवड केली जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करावेत.- **आयुषी सिंह** (भा.प्र.से.)अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती*

# १३३ रक्तदात्यांनी केले रक्तदान, गो.सी. टोम्पे महाविद्यालयात विरमातेची रक्ततुला

## देशासाठी सीमेवर लढणाऱ्या भारतीय सैनिकांना समर्पित; भास्कर टोम्पे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२ चांदुर बाजार**

चांदूर बाजार येथील गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्व. संजय टोम्पे व समीर देशमुख यांच्या २२ व्या स्मृतीप्रीत्यर्थ देशातील वीर सैनिकांना समर्पित शहीद विरपुत्र कोशल्य गजानन राऊत यांच्या विरमाता संगीता गजानन राऊत यांची १३३ राक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानाने रक्ततुला यावेळी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे, संस्थेचे सचिव डॉ. विजय टोम्पे, सत्कारमूर्ती संगीता गजानन राऊत व त्यांचे कुटुंब, महेंद्र भुतडा, चांदुर बाजार नगरध्यक्षा मनीषा नांगलीया , नगरसेवक मनीष नांगलीया, मेजर आनंद पाथरकर व आदी उपस्थित होते मेजर आंनद पाथरकर यांनी देशसेवेत रुजू असतानाचा भावुक अनुभव सांगितला टोम्पे महाविद्यालय हे एकमेव असे महाविद्यालय आहे की जे दरवर्षी शहीद सैनिकांच्या वीरमाता व वीरपत्नीचे रक्ततुला घेऊन त्यांचा सन्मान व गौरव करत असते ही सैनिकासाठी फार मोठी गौरवाची गोष्ट असल्याचे ही त्यानी सांगितले तसेच आपली संस्था ही देशाकरीता शहीद सैनिकाच्या आईची रक्ततुला करुन समाज उपयोगी असे कार्यक्रम राबविते, हे देशहितासाठी मोठी गौरवाची बाब असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे यांनी रक्ततुलेचे हे २२ वे वर्ष असून असेच



सामाजिक कार्य घडत राहो त्यात आपल्या सर्वांचे सहकार्य आहे असे म्हणून उपस्थितांचे आभार मानले याप्रसंगी वीरमाता संगीता गजानन राऊत यांचा साडी-चोळी स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व रक्ततुलाही करण्यात आली या भव्य रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, परिसरातील नागरिक, विविध सामाजिक संघटना सहभागी होऊन एकूण १३३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली रक्तदान शिबिरासाठी संत गाडगेबाबा रक्तपेढीने चे सहकार्य लाभले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' व 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' लागू

## नागरिकांना शहरातच मिळणार ५ लाखांपर्यंत मोफत उपचार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**

अमरावती महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित महत्त्वपूर्ण सभेमध्ये अमरावतीकरांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेद्वारे संचालित सर्व १३ शहरी आरोग्य केंद्रांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत अंगीकृत करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आता महागडे उपचार मिळवण्यासाठी दूरच्या रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही, तर शहरी आरोग्य केंद्रांमधूनच योजनांचा थेट लाभ घेता येणार आहे.या दोन्ही योजनांच्या माध्यमातून एकूण २३९९ आजारांवर पूर्णपणे मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या आरोग्य विमा योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष एकत्रित ५ लाख रुपयांपर्यंतचा उपचार खर्च शासनाकडून केला जातो. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकांतील कुटुंबांना मोठा आधार मिळणार



आहे.प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे को-ब्रँडेड 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गोल्डन कार्ड' असणे बंधनकारक आहे. हे कार्ड नसल्यास योजनेचा लाभ मिळू शकणार नाही. त्यामुळे ज्या नागरिकांकडे अद्याप गोल्डन कार्ड उपलब्ध नाही, त्यांनी तात्काळ आपल्या जवळच्या शासकीय दवाखान्यात संपर्क साधून कार्ड तयार करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.गोल्डन कार्ड तयार करताना ए-घधउ प्रक्रिया आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांचे राशन कार्ड अद्ययावत व ए-घधउ झालेले असणे गरजेचे आहे. तसेच आधार कार्ड अपडेट असणे आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक सोबत असणे आवश्यक आहे. मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीद्वारे ए-घधउ प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनच दवाखान्यात जावे, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.सभेमध्ये ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'वयवंदना योजना' अंतर्गत स्वतंत्र लाभाची माहितीही देण्यात आली. या योजनेअंतर्गत ७० वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्रपणे ५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा लाभ उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, वयवंदना कार्ड तयार करण्यासाठी संबंधित व्यक्तीचे फक्त आधार कार्ड आवश्यक आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनीही या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये या योजना लागू झाल्याने शहरातील प्राथमिक व दुय्यम आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहेत. नागरिकांना त्वरित उपचार, आर्थिक संरक्षण आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असल्याचे मत सभेत व्यक्त करण्यात आले. तसेच योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.या सभेला १३ शहरी आरोग्य केंद्रांतील सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जिल्हा समन्वयक डॉ. अंकिता मटाले, डॉ. अविनाश मरकड, विभागीय समन्वयक, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती कोवे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाठबागे यांनीही उपस्थित राहून योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.आरोग्य विभागामार्फत सर्व पात्र नागरिकांनी त्वरित आपले गोल्डन कार्ड व वयवंदना कार्ड तयार करून घ्यावे, तसेच आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले. या निर्णयामुळे अमरावती शहरातील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ आता अधिक सुलभ, पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने उपलब्ध होणार आहे.

# चांदूर बाजारमध्ये अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

## निंभोरा येथे महसूल विभागाची धडक कारवाई, तस्करांमध्ये खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चांदुर बाजार**

चांदूर बाजार तालुक्यात महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात मोहीम तीव्र केली आहे. या मोहिमेअंतर्गत मंगळवारी रात्री निंभोरा येथे वाळूची अवैध वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. या धडक कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध रेती तस्करांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून वाळूची अवैध वाहतूक पकडण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून निंभोरा परिसरात रात्रीच्या वेळी वाळूची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती.

या माहितीची खात्री पटल्यानंतर संबंधित ठिकाणी पथक तैनात करण्यात आले होते. वाळूने भरलेला ट्रॅक्टर क्रमांक एमएच २९, बीसी ३७६३ महसूल पथकाने जप्त केला. प्राथमिक चौकशीतून ही वाळू कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी विलास ढोले, जगदीश पानसे, प्रतिक चव्हाण आणि पद्माकर झळके यांचा सहभाग होता. जप्त केलेला ट्रॅक्टर आणि वाळू महसूल विभागाने ताब्यात घेतली असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिकांनीही महसूल विभागाच्या या कारवाईचे स्वागत केले असून, भविष्यातही अशाच कठोर कारवाया करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# सालबर्डी यात्रेसाठी १०० अतिरिक्त एसटी बसेस

## अमरावती, मोर्शी, वरुडहून ५० हजार प्रवाशांना सेवा; ३० लाखांचे उद्दीष्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

महाशिवरात्री यात्रेनिमित्त १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या सालबर्डी यात्रेसाठी एसटी महामंडळाने १०० अतिरिक्त बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेसद्वारे अमरावती, मोर्शी आणि वरुड येथून सुमारे ५० हजार प्रवाशांना सेवा पुरवली जाईल. या विशेष सेवेतून महामंडळाने ३० लाख रुपयांच्या अतिरिक्त उत्पन्नाचे उद्दीष्ट ठेवले आहे.

सालबर्डी यात्रा ही बहिरमनंतर जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा मानली जाते. या यात्रेतून दरवर्षी एसटी महामंडळाला अतिरिक्त उत्पन्न मिळते, तसेच महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील दूरच्या गावांहून येणाऱ्या प्रवाशांना वाहतूक सेवा उपलब्ध होते.

अमरावती आगारात एकूण ४२६ एसटी बसेस आहेत. त्यापैकी काही लांब पल्ल्याच्या फेऱ्या रद्द करून ही वाहने यात्रेसाठी वापरली जातील. बारावीच्या परीक्षा आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दळणवळणावर कोणताही परिणाम होणार नाही, याचीही काळजी घेतली जात आहे. एसटीचे विभाग नियंत्रक नरेंद्र बेलसरे यांनी या नियोजनाची तयारी पूर्ण केली आहे. सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर ही यात्रा भरते, त्यामुळे दोन्ही राज्यांचे प्रशासन यावर नियंत्रण ठेवते.

यात्रेकरूंसाठी अमरावती, मोर्शी आणि वरुड येथून धावणाऱ्या बसेस थांबवण्यासाठी सालबर्डीत तीन एकर जागा भाड्याने घेण्यात आली आहे. येथे तात्पुरते आगार उभारून बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. सालबर्डीप्रमाणेच कोंडेश्वर येथील यात्रेसाठीही एसटीने तयारी केली आहे. कोंडेश्वरसाठी राजापेठ आणि बडनेरा येथून सात ते आठ अतिरिक्त बसेस धावतील, ज्या सुमारे १२० फेऱ्या करतील. यातून एक लाख रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न अपेक्षित आहे.

वाहतूक नियंत्रणासाठी १५ अधिकारी सालबर्डी यात्रेत रात्रंदिवस कार्यरत राहतील. यात्रास्थळी उभारलेल्या तात्पुरत्या डेपोमध्ये हे अधिकारी आठ-आठ तासांच्या तीन पाळ्यांमध्ये काम करतील. अमरावतीहून सालबर्डीकडे जाताना मार्गातील मोठ्या गावांमध्येही एसटी कर्मचारी तैनात असतील. हे कर्मचारी मोबाईलवर अमरावतीच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून, एखाद्या थांब्यावर प्रवाशांची मोठी गर्दी झाल्यास तेथे बस मागवण्याची व्यवस्था करतील.

# नेरपिंगळाई येथील तहसील कार्यालयाचा प्रस्ताव धूळखात

## नेरपिंगळाई ते मोर्शीमधील २५ किमी अंतरामुळे नागरिक त्रस्त
## आ. राजेश वानखडे यांच्याकडून नागरिकांना अपेक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नेरपिंगळाई**

मोर्शी तालुक्यातील जवळपास २४ हजार लोक संख्या असणारे नेरपिंगळ्याई हे गाव आहे. हे गाव धामणगाव, शिरखेड, आणि नेरपिंगळाई महसूल मंडळमधील ६०-७० गावांचे मुख्य बाजारपेठ आहे. त्यामुळे नेरपिंगळाई येथे तहसील कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वाचावतचा प्रस्तावही काही वर्षांपूर्वीशासनाकडे पाठविण्यात आला होता; मात्र अद्याप तो प्रस्ताव धूळखात पडला असल्याचे चित्र आहे.महत्त्वाच्या कामांसाठी येथील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, कृषी, बैंकसह इतरनेरपिंगळाई हे एक महत्त्वाचे गाव आहे. नेरपिंगळाई हे मोर्शी तालुक्यातील शेवटचे गाव असून, नेरपिंगळाईला लागूनच अमरावती आणि तिवसा तालुक्याची हद्द आहे. जिल्ह्यातील काही तालुक्याची ठिकाणे असूनसुद्धा त्यांना तालुका दर्जा आहे; परंतु लोकसंखेच्या बाबतीत नेरपिंगळाईपेक्षा लहान येथे तिवसा विधानसभा मतदारसंघातील तहसील अंतर्गत १५९ खेडी येत असून, त्या कार्यालयावर मोठा भार आहे. त्यामुळे नेरपिंगळाई येथे तहसील कार्यालय मंजूर झाल्यास शिरखेड, धामणगाव आणि नेरपिंगळाई अशा महसूल मंडळांमधील अंदाजे ६० गावे विभाजित होतील आणि चालतील. मोर्शी हे ठिकाण २५ किमी अंतरावर असून साध्या १००रु च्या प्रतिज्ञापत्र करीता २०० रु चे पेट्रोल खर्च करून मोर्शीला जावे लागते.२०२३ मध्ये तत्कालीन तहसीलदारांनी याबाबतीत सकारात्मक मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तसेच माजी आमदार अरुण अडसड यांनीही तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या मागणीचे पत्र पाठविले होते; परंतु अद्याप त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. आता अधिवेशनात मोर्शी तालुका विभाजन मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वाघाच्या मृत्यूप्रकरणी चौघांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरूड**

तालुक्यातील वाई वर्तुळातील पंढरी बिटमध्ये ३ फेब्रुवारी रोजी एका पट्टेदार वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी वन विभागाने ४ आरोपींना अटक केली. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.

अनिल अजमिरे (४६), मुन्ना अजमिरे (५६), प्रेमलाल उईके (४२) व सुभाष सलामे (४६) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. महेंद्री वनसंवर्धन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वाई वर्तुळातील पंढरी विटमध्ये ३ फेब्रुवारी रोजी सकाळी एका पट्टेदार वाघाचा कुजलेला अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती.

वन विभागाचे कर्मचारी गस्तीवर असताना त्यांना जंगलातील एका भागातून दुर्गंधी आल्याने हा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर वरिष्ठ वनाधिकाऱ्यांसह स्थानिक कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पाचारण करून त्या पट्टेदार वाघाच्या मृतदेहाचे जागीच शवविच्छेदन करण्यात आले. त्याच ठिकाणी वाघाच्या मृतदेहाला अग्नी देण्यात आली. त्यानंतर विभागीय वनाधिकारी कमलेश पाटील, वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे यांच्या मार्गदर्शनात या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर या प्रकरणात अनिल अजमिरे, मुन्ना अजमिरे, प्रेमलाल उईके व सुभाष सलामे यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.

# घोराडचे सरपंच, उपसरपंच अपात्र

## कंत्राटदाराला देयके न दिल्याचा ठपका : सचिवाची एक वेतनवाढ रोखली




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२वरूड**

वित्त आयोगातील पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनचे काम पूर्ण होऊनही कामाचे बिल कंत्राटदारास अदा न केल्याने कंत्राटदाराने केलेल्या तक्रारीवरून अपर आयुक्तांनी घोराड गावाच्या महिला सरपंचा व उपसरपंचांना अपात्र घोषित केले आहे. तर सचिवांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. या कारवाईने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील घोराड येथील पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन टाकण्याचे काम चौदाव्या वित्त आयोग २०१९ योजनेंतर्गत करण्यात आले होते. सदर काम कंत्राट बंडू गोळे नामक कंत्राटदाराला मिळाला होता. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराने काम पूर्ण केले. दरम्यान, २०१८ मध्ये तत्कालीन सरपंचांनी कंत्राटदाराचे १,३०,९४१ रुपयांचे बिल देण्यास मान्यता देऊन ठरावसुद्धा घेतला. त्यानंतर एका ग्रामपंचायत सदस्याने गटविकास अधिकाऱ्यांकडे काम झालेच नसल्याची तक्रार केली. गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर सदर कंत्राटदाराची कामाची रक्कम प्रलंबित असल्याने सचिवांना जबाबदार धरून एक वेतनवाढ रोखण्याचा प्रस्ताव मांडला. संबंधित ग्रामपंचायतीस कंत्राटदाराचे बिल देण्यास लेखी आदेश दिले. मात्र, गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाला केराची टोपली दाखविली. त्यामुळे कंत्राटदार बंडू गोळे यांनी अपर आयुक्तांकडे प्रकरण दाखल केले. या प्रकरणी अपर आयुक्तांनी अर्ज मान्य करीत चौकशी केली.दरम्यान, झालेल्या सुनावणीनंतर घोराड ग्रामपंचायतीच्या सरपंचा शिल्पा सचिन गोडबोले व उपसरपंच हरिदास केशव उमाळे यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग तथा कर्तव्यात कसूर केल्याचा उपका ठेवत सदस्यपदाकरिता अपात्र घोषित केले. त्यामुळे घोराडचे सरपंच, उपसरपंच पदावरून पायउतार झाले आहेत.

# राष्ट्राय प्रधान मुखाया सरपच संघाची नवी कार्यकारिणी जाहीर

## सरपंचांच्या विविध समस्यांवर झाले विचारमंथन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव खंडेश्वर**

राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघटनेच्या वतीने येथील शासकीय विश्रामगृहात तालुकास्तरीय सरपंचांची बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत नांदगाव खंडेश्वर तालुक्याची नवी कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली.

खेडपिंपरी येथील सरपंच मंगेश कांबळे यांची तालुकाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी मोरेश्वर दिवटे, तालुका उपाध्यक्षपदी धवलसरी येथील सरपंच मलिकअली, कार्याध्यक्षपदी पिंपरी निपाणी येथील सरपंच विशाल रीठे, सचिवपदी खिरसाना (निरसना) येथील सरपंच विशाल मेश्राम यांची तर कोषाध्यक्षपदी वेणी गणेशपूर येथील सरपंच मोनिका कराडे यांची निवड करण्यात आली. बैठकीचे अध्यक्षस्थान संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके व प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले यांनी भूषविले. दोन्ही मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतींचे अधिकार,सरपंचांवर होणारा प्रशासकीय अन्याय, निधी वितरणातील अडचणी, विकास कामांतील विलंब यासह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीला जावरा येथील सरपंच अमरीश काकडे, खंडाळा येथील सरपंच उमेश दहातोंडे, धानोरा फसी येथील ग्रामपंचायत सदस्य सुशील थोरात, शिवरा येथील सरपंच राहुल वणवे यांच्यासह तालुक्यातील सरपंच व ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खोलापूर परिसरातील शिवभक्त मोठ्या महादेवाच्या वाटेवर


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२खोलापूर**

महाशिवरात्रीच्या निमित्ताने मोठ्या महादेवाला जाण्याची प्रथा आजही कायम असून, शेकडो भक्तांनी त्रिशूल घेऊन महादेवाची वाट पकडली आहे.

भाविक भक्त कुटुंबीयांसह त्रिशूलाचे (बाण) पूजन करण्यात येत आहे. वर्षानुवर्षांपासून मोठ्या महादेवाला ग्रामीण भागातून भाविक भक्त भोलेंच्या दर्शनाला सहकुटुंब जातात. दरवर्षी महादेवाची वारी करणारे भोलेनाथाचे भक्त आठ दिवसांपासून त्रिशूल घेऊन ग्रामीणपरिसरातील गावांमध्ये घरोघरी जाऊन आराधना करतात. त्यानुसार यंदाही खोलापूर परिसरात महादेवाच्या भक्तांमध्ये उत्साह दिसून येत आहे.

# बारावीच्या पहिल्याच पेपरला ७७ विद्यार्थ्यांची अनुपस्थिती

## दर्यापूर तालुक्यात २,५९६ विद्यार्थ्यांनी दिला इंग्रजीचा पेपर ७७ विद्यार्थी ची दांडी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बारावीची परीक्षा मंगळवार, १० फेब्रुवारीपासून सुरू झाली. दर्यापूर तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागाने एकूण ११ परीक्षा केंद्रे निश्चित केली आहेत. इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला एकूण ११ केंद्रावरील ७७ विद्यार्थ्यांनी विविध कारणांमुळे अनुपस्थिती दर्शविली.

दर्यापूर तालुक्यात २६७३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. तालुक्यात ११ केंद्रावर २,५९६ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाचा पहिला पेपर दिला. कर्मयोगी गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय शेंडगाव, प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालय दर्यापूर, जेडी पाटील सांगळूदकर कनिष्ठ महाविद्यालय दर्यापूर, आदर्श कनिष्ठ महाविद्यालय दर्यापूर, काशीबाई अग्रवाल कनिष्ठ महाविद्यालय येवदा, स्व. दादासाहेब हुतके कनिष्ठ महा. वडनेर गंगाई, रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय दारापूर, खल्लार कनिष्ठ महाविद्यालय खल्लार, झामाजी वाकपांजर कनिष्ठ महाविद्यालय थिलोरी,शहीद शालिकराम कनिष्ठ महा. सासन रामापूर, राष्ट्रीय कनिष्ठ महा. टोंगलाबाद अश्या आकरा केंद्रावर बारावीची परीक्षा पार पडणार आहे. परीक्षा सुरळीत व पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी सर्व परीक्षा केंद्रांत कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे, तसेच कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात आल्या असून, भरारी पथकांची नियुक्तीही करण्यात आली आहे.

### भरारी पथकाकडून तपासणी

परीक्षा काळात प्रत्येक केंद्रांत पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत आहे. भरारी पथकांकडून अचानक तपासण्या सुद्धा केल्या जाणार आहे.

परीक्षार्थ्यांना वेळेत केंद्रावर पोहोचता यावे, तसेच शांत व तणावमुक्त वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी केंद्रप्रमुख व शिक्षकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

**संतोष घुगे, गटशिक्षणाधिकारी.**

# कामगारविरोधी श्रमसंहितांच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## शेकडो कामगार व महिलांचा सहभाग; घोषणाबाजीने परिसर दणाणला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती व संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या आंदोलनात शेकडो कामगार व महिलांनी सहभाग घेत जोरदार घोषणाबाजी केली.मोर्चाची सुरुवात इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर मोर्चेकऱ्यांनी घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. चारही श्रमसंहिता रद्द करा, कंत्राटी पद्धत बंद करा, किमान वेतन २६ हजार रुपये करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.केंद्र सरकारने लागू केलेल्या चार श्रमसंहितांमुळे कामगारांचे कामाचे तास, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, संघटन स्वातंत्र्य व सामूहिक वाटाघाटीचा हक्क धोक्यात येणार असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. तसेच कंत्राटीकरण बंद करून सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, मनरेगा अंतर्गत २०० दिवस रोजगार देणे, शेतमालाला कायदेशीर हमीभाव देणे आदी मागण्या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधानांना निवेदन पाठविण्यात आले.

# अमरावती ग्रामीण पोलीस भरतीची वेळ बदलली आता पहाटे ४ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन

## जोग स्टेडियमवर भरती प्रक्रिया सुरू; वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. यापूर्वी उमेदवारांना सकाळी ५.३० वाजता हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या; मात्र वाढत्या उष्णतेचा विचार करून आता सर्व इच्छुक उमेदवारांनी पहाटे ४ वाजताच भरतीस्थळी उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती ग्रामीण पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे.ही भरती प्रक्रिया जोग स्टेडियम, अमरावती येथे आयोजित करण्यात आली असून कालपासून प्रत्यक्ष चाचण्या सुरू झाल्या आहेत. दरम्यान, बीड जिल्ह्यात पोलीस भरतीदरम्यान एका युवकाच्या दुर्दैवी घटनेची बातमी समोर



आल्यानंतर प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. उमेदवारांच्या आरोग्याची काळजी आणि वाढत्या तापमानाचा परिणाम लक्षात घेता भरतीची वेळ पुढे आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.अमरावती ग्रामीण अधीक्षक कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे की, सर्व उमेदवारांना त्यांच्या भरतीची तारीख ऑनलाईन पद्धतीने देण्यात आलेली आहे. संबंधित तारखेनुसार उमेदवारांनी नियोजित दिवशी सकाळी ४ वाजता जोग स्टेडियम येथे उपस्थित राहावे. वेळेत बदल झाल्याची नोंद घेऊन कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी उमेदवारांनी वेळेआधीच उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे, प्रवेशपत्र व इतर सूचना यांची पूर्तता करूनच भरती प्रक्रियेसाठी हजर राहावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# १० लाखांच्या अंडी पुरवठा घोटाळ्यात तिघांना कारणे दाखवा नोटीस; आदिवासी संघटना आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात घडलेल्या १० लाखांच्या अंडी पुरवठा घोटाळ्याने पुन्हा एकदा मेळघाट प्रशासन हलवून सोडले आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने उपायुक्तांना निवेदन देत तत्काळ कारवाईची मागणी केल्याने प्रकरणाला नवी कलाटणी मिळाली आहे. अंडी पुरवठ्याचे अतिशय संशयास्पद देयक तयार झाल्यानंतर संबंधित फाईल कार्यालयातून खिडकी तोडून आणि कपाट फोडून गायब करण्यात आली होती. कार्यालयात अनेक कपाट असताना, नेमके अंडी पुरवठा देयकाची फाईल असलेल्या कपाटालाच लक्ष्य केले गेल्याने अंतर्गत संगनमताचा तीव्र संशय उपस्थित होत आहे.

प्रकरणानंतर प्रशासनाने पोलिसांत तक्रार दिली होती; मात्र दीर्घ कालावधी उलटूनहीकोणताही आरोपी सापडला नाही. त्यामुळे प्रकरण जाणीवपूर्वक थंडबस्त्यात टाकले गेले, असा आरोप आदिवासी संघटनांनी केला आहे. दरम्यान, माध्यमांमध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी कार्यालयात खळबळ उडाली आणि उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली. या समितीने संपूर्ण घडामोडींची तपासणी करून अप्पर आदिवासी आयुक्तांकडे सविस्तर अहवाल सादर केला आहे, ज्यात




> प्रकल्प अधिकारी कार्यालयातून चौकशी अहवाल प्राप्त झाले असून त्यानुसार प्रथम दर्शनी संबंधित तीन अधिकाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस जारी करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
>
> **श्रीकांत धोटे**
> **उपायुक्त, आदिवासी**
> **अप्पर आयुक्त कार्यालय**
> **अमरावती.**

कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. त्यांना 'कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.अंडी पुरवठ्याची बिले मंजूर होऊन देयके निघाली: परंतु त्याच कालावधीत केलेल्या केळी पुरवठ्याचे देयक मात्र आजही प्रलंबित असल्याने देयक प्रक्रिया निवडक पद्धतीने करण्यात आल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. एका बाजूला प्रत्यक्ष केळीचा पुरवठा करणाऱ्यापुरवठाधारकाचे देयक थकवले गेले, तर दुसऱ्या बाजूला अंड्याचे काल्पनिक देयक प्रक्रिया करून निधी गहाळ करण्यात आल्याचा आरोप आदिवासी विकास परिषदेने केला आहे.या प्रकरणात आता स्थानिक आदिवासी संघटना अत्यंत आक्रमक बनल्या असून, दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आदिवासी भागासाठी असलेला विकासाचा निधी गहाळ करणारे अधिकारी कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नयेत. प्रकल्प कार्यालयात घडलेली फाईल चोरी ही साधी चोरी नसून महाघोटाळा लपवण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे. आता यामध्ये विरोधीपक्षनेत्यांनी यामध्ये उडी घेतली असून आदिवासी मंत्र्यांकडे चौकशीची व कार्यवाहीची मागणी केली आहे. त्यामुळे चौकशी अहवालावर तत्काळ निर्णय घेऊन दोषींची नावे जाहीर करणे, निलंबन व गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, अशी मागणी जोर धरत आहे.

# विविध शासकिय योजनांची माहिती

## केंद्रीय संचार ब्युरो अमरावतीचा अभिनव उपक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार केंद्रीय संचार ब्युरो अमरावती चे वतीने व तहसिल कार्यालय धारणी व पंचायत समिती धारणी यांचे सोबतच धारणी तालुक्यातील सर्व शासकिय विभाग यांच्या संयुक्त विदयमाने नविन प्रशासकिय इमारत तहसिल कार्यालय धारणी येथे शासनाच्या विविध दुर्गम भागातील नागरिकाकरीता आदिवासी कल्याण योजना व त्याबाबत जनजागृती व माहिती यांची मल्टीमिडीया चित्र प्रदर्शनी आयोजीत करण्यात आलेली असून दिनांक १२ फेब्रुवारी रोजी या प्रदर्शनीचे उदघाटन धारणीचे तहसिलदार श्री प्रदीप शेवाळे यांचे हस्ते करण्यात आले या प्रसंगी श्री अमोल अंबुलकर, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, श्री रमेश वाढीवे, पुरवठा अधिकारी, श्रीमती शितल महाजन, नगर पंचायत धारणी कार्यालयीन अधिक्षीका, श्री संजय इंगळे एबीपी फेलो– निती आयोग अधिकारी हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे उदघाटनाप्रसंगी कार्यक्रमाचे उदघाटक व धारणीचे तहसिलदार यांनी मल्टीमिडीया चित्र प्रदर्शनीचे अवलोकन केले प्रसंगी त्यांनी धारणी तालुकावासीयांना या चित्रप्रदर्शनी माध्यमातून मिळत असलेल्या माहितीचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुकावासीयांना केलेले असून कार्यक्रमाचे कौतुक सुध्दा केले. सोबतच या कार्यक्रमाप्रसंगी आयोजकाव्दारे विविध स्पर्धांचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस सुध्दा प्रसंगी वितरण करण्यात आले.

सदर चित्रप्रदर्शनी ही दिनांक १२ व १३ फेब्रुवारी अशी दोन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहणार असून सर्व तालुकावासींयाकरीता नविन प्रशासकिय इमारत तहसिल कार्यालय धारणी येथे सुरु राहणार असून या प्रदर्शनीचा सर्व तालुकावासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार केंन्द्रीय संचार ब्युरो अमरावती चे क्षेत्रिय प्रचार अधिकारी श्री शशीकांत पटेल यांचेकडून करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाकरीता तहसिल कार्यालय धारणी, पंचायत समिती धारणी, नगर पंचायत धारणी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय धारणी, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय धारणी, पोलिस विभाग धारणी यांचे या कार्यक्रमाकरीता सहकार्य लाभलेले आहे.

# ट्रकच्या धडकेत युवकाचा मृत्यू

## परफेक्ट धर्मकाटा परिसरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परफेक्ट धर्मकाटा परिसरात ट्रकच्या धडकेत एक युवक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, शरीफा मशिद परिसरातील रहिवासी अब्दुल दिशान अब्दुल जाकिर (वय १८) याला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली.या अपघातात अब्दुल दिशान हा गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी इर्विन शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते मात्र उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान, नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी


## अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आयोजन : राज्य, विभागीय आणि जिल्हास्तरावरील पुरस्कारांचे होणार वितरण; प्रकाश पोहरे, विलास बडे यांच्यासह ५ पत्रकारांचा होणार सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार रोजी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व.सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियम येथे सायंकाळी ४.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे. राज्य, विभागीय तसेच जिल्हास्तरावरील विविध पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. अमरावती जिल्ह्यातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारिता क्षेत्रात सेवा देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यावर्षी देखील संघटनेच्या वतीने हे पुरस्कार







दिले जाणार आहेत. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह अतिथी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले यांची देखील उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमातून स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार ३० वर्षांची प्रदीर्घ पत्रकारिता सेवा तसेच राजकीय, पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या विषयावर लिखाण करण्यासाठी राज्यभर ख्याती असलेले दै.देशोन्नतीचे संपादक असलेले प्रकाश पोहरे यांना दिला जाणार आहे. ४१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. तसेच स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार यावर्षी ३० वर्षांची पत्रकारिता सेवा आणि बातमीकडे पाहण्याचा सखोल दृष्टीकोण, अभ्यासू आणि अचूक विश्लेषण, प्रसंगावधान असलेले आयबीएन १८ चे वृत्त निवेदक विलास बडे यांना दिला जाणार आहे. ३१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच विभागीय पत्रकारिता पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यात नमो महाराष्ट्र या दैनिकाचे संपादक असलेले आणि ३० वर्षांचा पत्रकारिता क्षेत्राचा अनुभव असलेले वसंतराव घुईखेडकर यांना दिला जाणार आहे. दै.सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले पुरस्कृत हा पुरस्कार २१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा आहे.

अमरावती जिल्हा आणि ग्रामीण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना देखील जिल्हास्तरीय पुरस्कार संघटनेच्या वतीने दिले जातात. यामध्ये जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा यांना त्यांच्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या सेवेसाठी दिला जाणार आहे. दै. विदर्भ मतदार पुरस्कृत या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे असणार आहे. तसेच जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार दै.आपली मातृभूमीचे वरूड तालुका प्रतिनिधी असलेले चंद्रकांत भड यांना वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषित समाजाचे प्रश्न या विषयावरील सातत्यपूर्ण लिखाणसाठी दिला जाणार असून पी.आर.पोटे एज्युकेशनल गृप ऑफ अमरावती यांच्याकडून पुरस्कृत असलेला हा पुरस्कार देखील ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा असणार आहे.

या पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याला अमरावती जिल्ह्यातील शहर तसेच ग्रामीण क्षेत्रात कार्य करणारे समस्त पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे मान्यवर, नागरिक बंधू आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावती जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाढीव वेतनाचा हप्ता रखडला; एस.टी. कामगारांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

## ६५०० रुपयांच्या वेतनवाढीच्या थकबाकीवरून संताप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील कर्मचारी प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाच्या तयारीत आहेत. थकबाकीचा हप्ता देण्याबाबत एसटी महामंडळ आणि सरकारकडून सकारात्मक निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या आश्वासनानुसार एसटी कामगारांना दरमहा दिला जाणारा वाढीव वेतनाचा हप्ता ११ फेब्रुवारी रोजीपर्यंत देण्यात यावा. अन्यथा १२ फेब्रुवारी रोजीपासून राज्यभरात निदर्शने सुरू करण्यास येतील, असा इशारा एसटी कर्मचारी संघटनेच्यावतीने देण्यात आला होता.

अमरावती मध्ये विभागीय कार्यालयासमोर आज कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने करीत आपला निषेध नोंदविला. अनेक कर्मचाऱ्यांनी वाढीव हप्त्याचा विचार करून कर्ज, हप्ते व घरगुती खर्चाचे नियोजन केले होते. अचानक हप्ता थांबल्यामुळे आर्थिक अडचणी वाढल्या असून कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.या पार्श्वभूमीवर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प. महामंडळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. सुमारे रु. १२० कोटींच्या थकबाकीची फाईल मंत्रालयात सादर झाल्याची माहिती देण्यात आली असून दि. १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी घेऊन तातडीने फरकाची रक्कम वितरित करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले.दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी भोसरी (पुणे) येथील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्थेत झालेल्या संघटनेच्या मध्यवर्ती कार्यकारिणी बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली. कामगारांच्या भावना लक्षात घेऊन दिलेल्या आश्वासनाची तात्काळ पूर्तता करावी व यापुढे वेतनासोबत देय वाढीव हप्ता नियमित अदा करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.यावेळी मकसूद भाई मोहित देशमुखजय चव्हाणश्याम इसळ,सुरेंद्र अस्वार,मारोती राठोड,नंदू नवाथे,नौशाद बेग,जेपी इंगळे,अनिल भालचंद्रसमीर देशमुख,शेख कलीमइम्रान भाई, सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# १४ फेब्रुवारी 'व्हॅलेंटाईन डे' निमित्त शाळा-महाविद्यालयांत गैरप्रकार रोखण्यासाठी भारतीय संस्कृतीविषयक उपक्रम राबवावेत; हिंदु जनजागृती समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

'व्हॅलेंटाईन डे'च्या पार्श्वभूमीवर शाळा–महाविद्यालयांमध्ये होणारे संभाव्य गैरप्रकार, विद्यार्थिनींची छेडछाड, शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घटना तसेच तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी भारतीय संस्कृतीविषयक उपक्रम राबवावेत, अशी मागणीचे निवेदन हिंदु जनजागृती समिती तर्फे जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन व शिक्षण विभागाला दिले आहे.विद्यार्थी हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत; परंतु दुर्दैवाने 'व्हॅलेंटाईन



डे'सारख्या पाश्चात्त्य प्रथेमुळे काही विद्यार्थी अभ्यासापासून दूर जाऊन चंगळवादाच्या आहारी जात असल्याचे दिसते. या दिवशी शाळा–महाविद्यालयांच्या बाहेर होणारी गर्दी, मुलींची छेडछाड, एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, तसेच शैक्षणिक संकुलाचे पावित्र्य भंग करणारी कृत्ये घडण्याची शक्यता असते. अनेकदा विद्यार्थी तणावाखाली येऊन नैराश्यात जातात किंवा आत्महत्यांसारखी टोकाची पावले उचलतात.'व्हॅलेंटाईन डे'च्या नावाखाली आयोजित खाजगी पार्ट्यांमध्ये मद्य व अंमली पदार्थांचा वापर करून तरुण पिढीला व्यसनाधीन करण्याचे प्रकार घडत आहे. या दिवशी संतती प्रतिबंधक साधनांच्या विक्रीत वाढ होते हे या दिवशी होणाऱ्या अनैतिक संबंधातील वृद्धी दर्शवते. काही समाजकंटक आणि धर्मांध युवक खोटी ओळख सांगून हिंदू युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात, ज्यांचे रूपांतर पुढे लव जिहाद मध्ये होऊन पुढे त्या युवतीचे आयुष्य उध्वस्त होते. तसेच तरुणांकडून दुचाकीवर जीवघेण्या कसरती, सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज करणे इत्यादींमुळे अपघातांचे प्रमाण वाढते.विद्यार्थ्यांनी आई–वडिलांचा व शिक्षकांचा आदर करावा आणि भारतीय मूल्ये जोपासावीत, यासाठी १४ फेब्रुवारीला 'मातृ–पितृ पूजन दिन' साजरा करणे हा एक सकारात्मक पर्याय असल्याचे समितीने म्हटले आहे.सदर निवेदन जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त अमरावती शहर, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण व शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहे.सौ रंजना पांडे, सौ संगीता राठी, श्री पंकज बारबुदे,कु.सुनिता कुकुटकर ,वेदांती दातीर,निराली होले,वैदेही चरपे,मेघशाम मावळे ,सौ कांचन शर्माचेतन वैद्य, गिरीश जामोदे, इशिका बाळापुरे, सौ अर्चना मावळे, पिंकी घटोरिया, सचिन वैद्य आधी हिंदुत्वनिष्ठ निवेदन देताना उपस्थित होते


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत